भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर

ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur

An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२६ –२७: साप्ताहिक दुसरा पीक सल्ला

## (कालावधी १८ जून ते २४ जून २०२६)

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | | | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जून | | | | | | | जून | | | | |
| | | 09 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
|  | धुळे | | | | | | | | 0.1 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नंदुरबार | | | | | | | | 0.2 | 0.1 | 0 | 0 | 0 |
| | जळगाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अहमदनगर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0 | 0 | 0 | 0 |
| | औरंगाबाद | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0 | 0 | 0 | 0 |
| | जालना | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | बीड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0 | 0 | 0 | 0 |
| | नांदेड | | | | | | | | 0.1 | 0 | 0.2 | 0.2 | 1.4 |
| | परभणी | 0 | 0 | 0 | 0 | 25 | 0 | 7 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| | हिंगोली | | | | | | | | 0.1 | 0 | 0 | 0.6 | 0.4 |
| | बुलढाणा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.2 | 0 | 0 | 0 | 0 |
| | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 12.6 | 0 | 7 | 0.3 | 0.1 | 0 | 0 | 0 |
| | वाशीम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.2 | 0 | 0 | 0.2 | 1.2 |
| | अमरावती | 20 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 15 | 1 | 0.5 | 0.1 | 0 | 0 |
| | यवतमाळ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.7 | 0.3 | 0.6 | 0.7 | 2.2 |
| | वर्धा | 1 | 0 | 0 | 0 | 4.6 | 14 | 0 | 1.6 | 0 | 0.3 | 1.2 | 1.4 |
| | नागपूर | 0 | 0.2 | 0 | 0 | 32 | 5.3 | 7 | 2 | 0.7 | 0.2 | 1.2 | 10.8 |
| | चंद्रपूर | 8 | 0 | 0 | 5 | 12 | 0 | 8 | 1.2 | 0.6 | 1.8 | 3.2 | 11.6 |
| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | | 0.1 to 2.4 मिमी | | 2.5 to 15.5 मिमी | | 15.6 to 64.4 मिमी | | | | 64.5 to 115.5 मिमी | | 115.6 to 204.4 मिमी | |
| पावसाची श्रेणी | | खूप हलका पाऊस | | तुरळक पाऊस | | मध्यम स्वरूपाचा पाऊस | | | | मुसळधार पाऊस | | अति मुसळधार पाऊस | |

**पीक परिस्थिती:**

**अकोला येथे** आगामी खरीप हंगामासाठी जमिनीची पूर्वमशागत पूर्ण झाली आहे. वखरणी, शेत समतल करणे, शेणखताची मात्रा देणे इत्यादी सर्व मशागतीची कामे पूर्ण झाली आहेत. कापूस पेरणीसाठी सरी-वरंबे तयार करण्याचे काम सध्या सुरू आहे.

**राहुरी येथे** बागायती कापूस पिकाची पेरणी झालेली असून पिकाचे वय १ ते २२ दिवस आहे. पीक दोन पानांच्या अवस्थेपासून सुरुवातीच्या वाढीच्या अवस्थेत आहे. खाडे भरण्याचे काम सुरू आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांनी जमीन तयार करणे, वखरणी,

शेत समतल करणे, शेणखत टाकणे आदी सर्व पूर्वमशागतीची कामे पूर्ण झालेली आहेत. मात्र, पुरेसा पाऊस न झाल्यामुळे बहुतांश कोरडवाहू क्षेत्रातील कापसाची पेरणी अद्याप झालेली नाही.

**नांदेड येथे** पेरणी झालेल्या कापूस पिकाचे वय ० ते १५ दिवस असून पीक रोपावस्थेत आहे. पिकामध्ये खाडे भरणे व विरळणी (थिनिंग) करण्याची कामे सुरू आहेत. कोरडवाहू शेतकऱ्यांनी जमीन तयार करणे, वखरणी, समतलीकरण, शेणखताची मात्रा देणे आदी सर्व पूर्वमशागतीची कामे पूर्ण झालेली आहेत. कोरडवाहू क्षेत्रात पुरेसा पाऊस झाल्यानंतर कापसाची पेरणी सुरू करावी. सध्या पिकावर कोणत्याही किडी किंवा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही.

**पीकसल्ला:**

अकोला येथे शेतकऱ्यांना ७५ ते १०० मि.मी. समाधानकारक पाऊस झाल्यानंतरच कापसाची पेरणी करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. कोरडवाहू परिस्थितीत कमी कालावधीच्या बीटी किंवा बिगर बीटी जाती/संकरित वाणांचा, तर बागायती परिस्थितीत मध्यम उशिरा ते उशिरा येणाऱ्या जाती/संकरित वाणांचा वापर करावा. बाजारातून उपलब्ध होणाऱ्या कापूस बियाण्यावर कीटकनाशकांची पूर्वप्रक्रिया केलेली नसल्यास, पेरणीपूर्वी बियाण्यास कार्बोक्सीन (व्हिटाव्हॅक्स) १ ग्रॅम किंवा थायरम ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. तसेच नत्र स्थिरीकरणासाठी ॲझोटोबॅक्टर व स्फुरद विद्राव्यतेसाठी पीएसबी (Phosphate Solubilizing Bacteria) २०-२५ ग्रॅम प्रति किलो बियाणे यांचीही बीजप्रक्रिया करावी. कापसामध्ये १:१ ओळ प्रमाणात मूग किंवा उडीद या आंतरपिकांचा समावेश करावा. पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत तण नियंत्रणासाठी पेंडीमेथालीन ३८.७ टक्के सीएस @ ७०० मि.ली. प्रति एकर पेरणीनंतर उगवणीपूर्व फवारणी करावी. देशी (Arboreum) कापसासाठी ६० × १५ किंवा ६० × ३० सें.मी. अंतर ठेवून ४०:२०:२० कि.ग्रॅ. एनपीके प्रति हेक्टर, सुधारित हिरसुटम (Hirsutum) जातींसाठी ६० × ३० सें.मी. अंतर व ६०:३०:३० कि.ग्रॅ. एनपीके प्रति हेक्टर, कोरडवाहू बीटी संकरित कापसासाठी ९० × ४५ किंवा ९० × ६० सें.मी. अंतर व ६०:३०:३० कि.ग्रॅ. एनपीके प्रति हेक्टर, तसेच बागायती बीटी कापसासाठी १२० × ३० किंवा १२० × ६० सें.मी. अंतर व १२०:६०:६० कि.ग्रॅ. एनपीके प्रति हेक्टर या शिफारशीनुसार लागवड अंतर व खतांच्या मात्रा वापराव्यात.

राहुरी येथे शेतकऱ्यांना कापसाची लवकर पेरणी टाळण्याचा सल्ला देण्यात येत आहे. ७५ ते १०० मि.मी. समाधानकारक पाऊस झाल्यानंतरच कापसाची पेरणी करावी. ज्या शेतकऱ्यांकडे पुरेशी सिंचन सुविधा उपलब्ध आहे, त्यांनी कापसाची पेरणी सुरू करावी. कोरडवाहू परिस्थितीत कमी कालावधीच्या बीटी अथवा बिगर बीटी जाती/संकरित वाणांचा, तर बागायती परिस्थितीत मध्यम उशिरा ते उशिरा येणाऱ्या जाती/संकरित वाणांचा वापर करावा. बाजारात उपलब्ध कापूस बियाण्यावर बुरशीनाशकांची पूर्वप्रक्रिया केलेली नसल्यास, बीजजन्य रोगांच्या व्यवस्थापनासाठी पेरणीपूर्वी कार्बोक्सीन ३७.५% + थायरम ३७.५% डीएस @ ३.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे (मुळकूज व जिवाणूजन्य करपा रोगासाठी) किंवा फ्लक्सापायरॉक्सॅड (३३३ ग्रॅम/लिटर एफएस) @ १.५ मि.ली. प्रति किलो बियाणे किंवा टेट्राकोनाझोल ११.६% w/w (१२.५% w/v) एसएल @ १.५ मि.ली. प्रति किलो बियाणे (मुळकूज रोगाच्या नियंत्रणासाठी) अशी बीजप्रक्रिया करावी. तसेच नत्र स्थिरीकरणासाठी ॲझोटोबॅक्टर आणि स्फुरद विद्राव्यतेसाठी पीएसबी (Phosphate Solubilizing Bacteria) @ २०-२५ ग्रॅम प्रति किलो बियाणे यांचीही बीजप्रक्रिया करावी. कापसामध्ये १:१ ओळ प्रमाणात मूग व उडीद या आंतरपिकांचा समावेश करावा. तसेच चवळी, मका, सेटेरिया (कांग) व झेंडू यांची सापळा पिके म्हणून लागवड करावी.

नांदेड येथे शेतकऱ्यांना जमिनीत पुरेसा ओलावा उपलब्ध झाल्यानंतर कापसाची पेरणी करण्याचा सल्ला दिला जातो. कोरडवाहू परिस्थितीत कापसाची पेरणी १२० × ४५ सें.मी. अंतरावर करावी. उच्च घनता लागवड पद्धती (High Density Planting System) अंतर्गत मध्यम व तांबड्या जमिनीत ९० × १५ सें.मी. अंतर ठेवावे, तर भारी व खोल जमिनीत तसेच बागायती परिस्थितीत ९० × ३० सें.मी. अंतरावर लागवड करावी. बिगर बीटी कापूस बियाण्यास पेरणीपूर्वी बीज व जमिनीद्वारे पसरणाऱ्या रोगांच्या व्यवस्थापनासाठी कार्बोक्सीन ३७.५% + थायरम ३७.५% डीएस @ ३ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. तसेच ॲझोटोबॅक्टर, पीएसबी (PSB) व केएमबी (KMB) या जैवखतांची १० मि.ली. प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. बागायती कापसासाठी पेरणीच्या वेळी खतांची मात्रा

दिली नसल्यास ६०:७५:७५ कि.ग्रॅ. एनपीके प्रति हेक्टर, तर कोरडवाहू कापसासाठी ४८:६०:६० कि.ग्रॅ. एनपीके प्रति हेक्टर ही मूलभूत खत मात्रा पेरणीपूर्वी किंवा पेरणीच्या वेळी द्यावी. पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत तण नियंत्रणासाठी पेंडीमेथालीन ३८.७% सीएस @ ७०० मि.ली. प्रति एकर या प्रमाणात उगवणीपूर्व फवारणी करावी.

## Post-season and pre-sowing package of practices

1. Clean up fields of residual stalks and partially opened bolls from the previous crop season. Do not stack the uprooted cotton stalks on field bunds. At the end of the crop season, the pink bollworm larvae of the last generation enter hibernation in crop residues like infested bolls. Therefore, such infested residues should be promptly destroyed to break the life cycle of pink bollworm. Residue destruction will also help to reduce the inoculum and infection of the new season's cotton crop by diseases like bacterial leaf blight, root rot, and fungal leaf spots.
2. Install at least 10 pheromone traps for pink bollworm, each at 20 m distance in the premises of market yards and ginning mills to trap post-season moths or suicidal emergence, if any. Change the lures in pheromone traps in a timely manner. Also, kill the larvae that come out of damaged seeds. This will help to check the spread of infestation of pink bollworm from ginning or market yard premises to nearby fields.
3. Avoid pre-monsoon sowing of the cotton crop. Early sown crops bear reproductive structures like squares and flowers early. The pink bollworm moths emerging from dormant populations of the previous season lay eggs on these squares and flowers, thus early sown crop supports completion of the new season's first generation of pink bollworm. If not controlled in time , the next generations of this population further spread onto the timely sown cotton crop with the onset of squares, flowers, and bolls.
4. Deep summer ploughing helps to expose and kill the dormant larvae and pupae hidden in the soil due to the scorching heat of the sun and predation by birds in April-May. Also, the birds following ploughed fields predate these life stages of insects. This helps in minimising the incidence of insects like pink bollworm, leaf-eating caterpillars, and soil-borne diseases like wilt, root rot, and nematodes on the coming season's cotton crop.
5. Crop rotation to be followed in the fields that were heavily infested with pink bollworm during the last season to break the life cycle of pink bollworm. Cotton is the only host of pink bollworm, therefore crop rotation helps to break the life cycle of this pest. Crop rotation is effective in checking the infection of soil-borne diseases and nematodes in disease-prone fields.
6. Grow sucking pest and disease-tolerant, short-duration, and early maturing varieties/hybrids/cultivars of cotton. This helps in avoiding unwanted spraying of pesticides to control sucking pests and diseases during the early crop growth stage. Pink bollworm infestation starts from mid-season and increases steadily towards the late season. Therefore, short-duration and early maturing varieties help to escape pink bollworm infestation in the late season.
7. Sowing of the cotton crop should be done in June, only after receipt of 80-100 mm of monsoon rainfall. To ensure proper germination and crop stand, to withstand the prolonged dry periods during early seedling stage, there should be optimum soil moisture. This also helps to avoid re-sowing due to prolonged dry spells of rainfall. Timely sowing in June helps to avoid early infestations of pink bollworm.
8. Increased awareness should be created among the cotton farmers regarding the implementation of an integrated pest management (IPM) strategy for the management of pink bollworm. The input dealers may also be advised to inform the farmers not to adopt pre-monsoon sowing. This will help to spread the right message to farmers more effectively

The detailed information regarding cotton production technology, e.g., selection of soil, varieties, fertilizer application, sowing methods, irrigation systems, management of weeds, insect pests and diseases, etc., can be availed from an Android-based **CICR Cotton App** developed by ICAR-CICR, Nagpur. The app can be downloaded free of cost from the Google Play Store. Additionally, the crop growth stage-specific and weather-based weekly advisories are uploaded on the website of ICAR-CICR (https://cicr.org.in/resource-weekly-advisory) also to be consulted for the benefit of farmers.


**Advisory issued by:**
**Dr. Vijay N. Waghmare**
Director, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur

**Compilation by** Dr. Isabella Agarwal
**Editing Team:**

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. G. T. Behere | Dr. A. S. Tayade | Dr. A. H. Prakash | Dr. S.K. Verma |
| Dr. S.K. Sain | Dr. Rishi Kumar | Dr. Babasaheb B. Fand | Dr. Ramkrushna GI |
| Dr. S.P Gawande | Dr. Shivaj Thube | Dr. R.R. Chapke | |

**Regional language translation**:

| | |
|---|---|
| **Hindi** | : Mr Ghanshyam Deogirikar & Mr Ashutosh Mishra |
| **Punjabi** | : Dr Amarpreet Singh |
| **Tamil** | : Dr. A. Manikandan & Dr. M Saravanan |
| **Telugu** | : Dr L. Rajesh Chaudhary |
| **Marathi** | : Dr Vrushali Deshmukh & Mrs Pooja Ghonge |
| **Gujrati** | : Dr H R. Desai & Dr Vivek Shah |
| **Oriya** | : Dr B. S. Nayak |
| **Kannada** | : Dr Neelkanth Hiremani, Dr Shashi Kumar |